## निवडक

### सांकवाळ येथे ३१ रोजी अभंग गायन स्पर्धा

■ टीम दैनिक हेराल्ड

**वास्को, दि. २५ :** सम्राट क्लब वास्कोतर्फे शुक्रवार दि. ३१ रोजी दुपारी ३ वाजता सांकवाळ येथील श्री शांतादुर्गा लक्ष्मी नृसिंह सांखळ्यो संस्थानच्या सभागृहात अखिल गोवा अभंग दायन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. हि स्पर्धा १८ ते ३५ वर्षे वयोगटातील स्पर्धाकांसाठी घेण्यात येणार आहे. विजेत्यांना अनुक्रम रु. ३ हजार, रु. २ हजार, रु. १ हजार व प्रमाणपत्र तसेच प्रत्येकी रु. ५०० ची दोन उत्तेजनार्थ बक्षिसे देण्यात येतील. प्रथम नावनोंदणी करणाऱ्या पहिल्या पंधरा स्पर्धकांनाच स्पर्धेत प्रवेश देण्यात येईल. अधिक माहितीसाठी रोहन बांदेकर यांच्याशी संपर्क साधावा.


### म्हापसा केंद्राची बारावीच्या पुरवणी परीक्षेची आसनव्यवस्था

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. २५ :** गोवा उच्च माध्यमिक हायस्कूलच्या बारावीच्या कला, विज्ञान, वाणिज्य व व्यावसायिक शाखांच्या पुरवण्या परीक्षा म्हापसा केंद्रातर्फे आसगाव येथील कुशे उच्च माध्यमिक विद्यालयात सोमवार दि. २६ रोजीपासून सुरू होत आहे, अशी माहिती मुख्य पर्यवक्षकांनी दिली आहे. पुरवण्या परीक्षेसाठी आसनव्यवस्था खालीलप्रमाणे, कला शाखा ८०००१ ते ८०२४८, वाणिज्य शाखा – ८०२४९ ते ८०९७०, विज्ञान शाखा – ८०४०९ ते ८०९७०, व्यावसायिक शाखा – ८०९७१ ते ८११५२.

### रवींद्र भवनतर्फे २८ रोजी योगेश सोमण यांचे व्याख्यान

■ टीम दैनिक हेराल्ड



**वास्को, दि. २५ :** येथील रवींद्र भवनातर्फे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त सावरकर आणि क्रांती या विषयावर मंगळवार दि. २८ रोजी सायंकाळी ६.३० वाजता रवींद्र भवनाच्या मनोहर पर्रीकर सभागृहात व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. या व्याख्यान कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून मराठी व हिंदी सिनेसृष्टीतील प्रसिद्धअभिनेते योगेश सोमण उपस्थित राहणार आहेत. सदर कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे. नागरिकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन रवींद्र भवनातर्फे करण्यात आले आहे.

### किटल–फातर्फाची आज ग्रामसभा

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २५ :** किटल–फातर्पाची ग्रामसभा रविवार दि. २६ रोजी ९.३० वाजता सरकारी हायस्कूल फातर्पा येथे होणार आहे. या बैठकीत मागील बैठकीच्या इतिवृत्ताला मंजुरी देण्यात येणार आहे. तसेच बजेटवर चर्चा करण्यात येणार आहे. ग्रामसभेत ग्रामस्थांनी उपस्थित राहावे, असे आवाहन सरपंच शीतल नाईक यांनी केले आहे.

### उसकई येथील जागबाई देवस्थानात आज 'दुर्गायाग'

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. २४ :** उसकई येथील देवी जागबाई पंचायत रवळनाथ देवस्थानात रविवार दि. २६ रोजी दुर्गायाग सोहळा आयोजित करण्यात आला आहे. भक्तजन कल्याणार्थ होणाऱ्या या सोहळ्याचा आरंभ सकाळी ९ वाजता सामुदायिक गणेशपूजनाने होईल. त्यानंतर देवस्थानात विविध धार्मिक विधी होतील. दुपारी १.३० वाजता महाप्रसाद होईल, तर संध्याकाळी भजन आणि आरती होणार आहे.

### तिशे बोरी येथे आज धार्मिक कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

फोंडा, दि. २५ : तिशे, बोरी येथील श्री जगदंबा भवानी मंदिरात रविवार दि. २६ रोजी संध्याकाळी ७ वाजता गोंधळ कार्यक्रम होणार आहे. यानिमित्त श्री जगदंबा भवानी मंदिर व नूतन मूर्ती स्थापनेच्या १७व्या वर्धापनदिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. सकाळी धार्मिक कार्यक्रम, दुपारी आरती, महाप्रसाद होणार आहे.

### आमोणे येथील पूर्वस बेताळ देवाचा मंगळवारी वर्धापनदिन

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. २५ :** येथील पूर्वस बेताळ देवाचा ६४वा वर्धापनदिन सोहळा तिथीनुसार मंगळवार रविवार दि. २६ रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.
यानिमित्ताने मंदिरात सकाळी ८.३० वाजता धार्मित विधींना प्रारंभ होईल. यावेळी गणेश १२.३० वाजता आरती, महागाऱ्हाणे, तीर्थप्रसाद होईल. या सोहळ्यानिमित्त रात्री १० वाजता सिद्धिविनायक दशावतार नाट्यमंडळ पिकुळे, दोडामार्ग यांचा 'श्रीकृष्ण मारुती युद्ध' हा नाट्यप्रयोग होणार आहे. भाविकांनी या उत्सवास उपस्थि राहावे, असे आवाहन शांतादुर्गा देवस्थान समितीच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# मांद्रे जुनसवाडा वनउद्यानात सुविधांची वानवा

## मुलांमध्ये निराशा : रोजंदारी कर्मचाऱ्यांची समस्या

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. २५ :** मांद्रे – जुनसवाडा प्रभागात असलेल्या वनउद्यानात लहान मुलांसाठी असलेल्या खेळ साहित्याची वानवा असल्यामुळे मुलांची निराशा होत असल्याने पालकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

जुनसवाडा येथील खडकाळ भागाचे सुयोग्य पद्धतीने काम करून त्याचे रूपांतर उद्यानात घडवून आणले होते. तत्कालीन माजी मुख्यमंत्री लक्ष्मीकांत पार्सेकर यांचे यात योगदान होते. या उद्यानात खडकाळ भागावर हिरवळ, झाडे, रंगीबेरंगी फुलझाडे लावून व आकर्षक झाडांची कापणी करून छान नियोजन वनखात्याने केले होते. त्यावेळी अधिकाऱ्यांनी मुलांसाठी खेळाचे साहित्य, बसण्यासाठी बाक व छोटेसे कॉफी हाऊस उभारण्यात येईल, असे सांगितले होते. सद्यस्थितीत बाक वगळता काहीही नसल्याचे दिसून येते. याची खंत असल्याचे मत पालक विश्वंभर मांद्रेकर यांनी व्यक्त केले.

ज्यावेळी उद्यानाची निर्मिती झाली, त्यावेळी तीन प्रकारचे क्रीडा साहित्य होते. त्यात वाढ करण्याची ग्वाही दिली होत. मात्र, त्या साहित्याची पार वाट लागली. परंतु पूर्वीची खेळाची साधने नव्याने बसविण्याची पाळी खात्यावर आल्याचे पेडणेकर यांनी सांगितले. अधिकाऱ्यांनी आर्श्वासनाची पूर्तता करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. जेणेकरून, जनतेच्या पैशातून तुमचे वेतन बँक खात्यात जमा होत असते, असे पेडणेकर यांनी नाराजीच्या सुरात सांगितले.

अवघ्या सुविधांची उपलब्धता केल्यास सुट्टी व अन्य दिवशी लहान मुलाची संध्याकाळ चांगली जाऊ शकते. अलीकडे सरकारी प्राथमिक विद्यालयांना ऊर्जितावस्था देण्यासाठी अनेक प्रकारे कार्य करण्याचा विडा उचलला असल्याने उद्यानाचे भाग्य बदलू शकणारे एकमेव असे लोकप्रतिनिधी म्हणजे आमदार जीत आरोलकर असल्याचे मत नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले.

मांद्रे मतदारसंघाचे आमदार जीत आरोलकर यांनी मतदारसंघातील रोजंदारी कर्मचाऱ्यांची समस्या व वनउद्यानाची समस्या निकाली काढण्यासाठी पावले उचलावीत, अशी मागणी सर्व थरातून होत आहे.

आमदार जीत आरोलकर यांनी लक्ष द्यावे

उद्यानाच्या सर्वकष उद्धारासाठी लोकप्रिय आमदार जीत आरोलकर यांनी व्यक्तीशः लक्ष दिल्यास वन उद्यानाचे भाग्य उजळू शकते, असे मत मांद्रेकर यांनी व्यक्त केले.



हरमल : सुविधांच्या प्रतीक्षेत असणारे जुनसवाडा येथील आकर्षक वनउद्यान.



जुनसवाडा वनउद्यानाचा ताबा वन खात्याकडे आहे. उद्यानाची एकदम वाईट अवस्था असल्याची जाणीव आहे. वन खात्याने त्याचा ताबा स्थानिक पंचायतीकडे दिल्यास सर्वकष उद्धारासाठी पंचायत स्तरावरून प्रयत्न केले जाईल.
– प्रशांत नाईक, सरपंच

### रोजंदारी कर्मचाऱ्यांना दिलासा द्यावा

हरमल, केरी व तुये अशा तीन ठिकाणी रोजंदारी कर्मचारी आहेत. युवक कुटुंबाचा आधार असल्याने सेवेत कायम होईन, या आशेने रुजू झाले. आता वयाची पन्नाशी पार केली, मात्र कायमस्वरुपी सेवेत नाही. दिलेली सर्व आश्वासने पोकळ निघाली. कित्येकजण निवृत्तीच्या उंबरठ्यावर असून त्यांना किमान निवृत्तीनंतर दिलासा द्यावा, व सेवेत असलेल्या कामगारांना कायम करावे, अशी मागणी होत आहे.

# न्हावेली वादळग्रस्तांना सरकारतर्फे मदत पुरवणार!

- मुख्यमंत्र्यांनी केली पाहणी
- नुकसानीचा आकडा एक कोटीपर्यंत

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. २५ :** न्हावेली साखळी येथे झालेल्या वादळात अनेकांची घरे, बागायती, वीज व्यवस्था आधींचे मोठे नुकसान झाले आहे, हा आकडा एक कोटीच्या आसपास आहे. नुकसानग्रस्तांना सरकारतर्फे सर्व प्रकारची मदत पुरवण्यात येणार असून सर्व अडथळे दूर करून वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी २४ तासात यंत्रणेने चांगले काम केल्याबद्दल मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी समाधान व्यक्त केले.

शनिवारी सकाळी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी न्हावेलीतील पडझड झालेल्या तसेच वादळाच्या तडाख्यात उध्वस्त झालेल्या घरांची बागायतीची सर्व ठिकाणी भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांच्या सरपंच कालिदास गावस, विश्वभर गावस, पंचायत सदस्य तसेचभाजप पदाधिकारी अग्निशामक दलाचे अधिकारी नुकसानग्रस्त उपस्थित होते.

वादळाचा वेग एवढा जबरदस्त होता की छप्पर कितीतरी मीटर लांब जाऊन पडले .अनेक कलमे मुळातून उद्ध्वस्त झाली. अनेक ठिकाणी घरांची मोठी पडझड झाली. तसेच सुमारे आठ खांब तसेच वीज वाहिन्या मोठ्या प्रमाणात उद्ध्वस्त झाल्याने नुकसानीचा आकडा हा ७५ लाख ते एक कोटीच्या आसपास असल्याचा प्राथमिक अंदाज स्वतः मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी यावेळी व्यक्त केला.

आपत्कालीन यंत्रणा, मुख्यमंत्री सहाय्य निधी, तसेच वैयक्तिकरित्या आपतग्रस्तांना आपण सर्व ती मदत करणार असून आवश्यक सोपस्कार पूर्ण करण्यासाठी पंचायत मंडळ तसेच स्थानिक भाजप कार्यकर्त्यांना आपण आदेश दिलेले आहेत, असेत्यांनी सागितले.

अनेकांची छप्परे उडालेली असून त्यांना तातडीने सर्वाधिक मदत पुरवण्यासाठी आपले प्रयत्न आहेत, असे डॉ. प्रमोद सावंत यांनी सांगितले. यावेळी त्यांनी सर्व नुकसानग्रस्तांची आस्थेने विचारपुस केली.

काहींचे पंप निकामी झालेत, तर काही अनेकांची छपरे उडाली अनेक ठिकाणी केळी सुपारी नारळाच्या बागा उद्ध्वस्त झाल्यात. आंबा, काजू, बागायती तसेच कलमे उद्ध्वस्त झाल्याने अनेक वर्षांची मेहनत पूर्णपणे वाया गेली याबद्दल एकूण या ठिकाणची परिस्थिती पाहून मुख्यमंत्री हे लावून गेले.

प्रत्येक नुकसान झालेल्या व्यक्तीला पूर्ण सहकार्य करताना आवश्यक ती मदत पुरवण्यात येणार असल्याचे डॉ. प्रमोद सावंत यांनी यावेळी सांगितले.



न्हावेली साखळी : वादळात नुकसान झालेल्या ग्रामस्थांशी चर्चा करताना मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत. सोबत सरपंच कालिदास गावस, पंचायत सदस्य ग्रामस्थ व भाजपचे पदाधिकारी. (विशांत वझे)

**धोकादायक फांद्या हटवा!**

यावर्षी पावसाने अचानक हजेरी लावताना अनेकांना वादळामुळे त्रास झाला, त्याबद्दल सरकार पूर्णपणे वेगवेगळ्या माध्यमातून त्यांना मदत करून त्यांची घरे पूर्ववत करण्यात येतील, असे डॉ. प्रमोद सावंत यांनी सांगितले.

अग्निशामक दलाचे अधिकाऱ्यांना मुख्यमंत्री डॉ. सावंत यांनी आदेश देताना मतदारसंघात जी धोकादायक झाडांच्या फांद्या आहे, तसेच वीज वाहिन्या व इतर बाबतीत सर्वे करून तातडीने छाटणी करणे वीज वाहिन्या दुरुस्त करणे धोकादायक खांब बदलणे यासाठी तातडीने लक्ष देऊन ही कामे पूर्ण करण्याचे आदेश दिले.

उपजिल्हाधिकारी, मामलेदार, तलाठी, पंचायत मंडळ व स्थानिक भाजप कार्यकर्त्यांनी तातडीने सर्व अहवाल तयार करून सादर करावेत. सर्व आपतग्रस्तांना मुख्यमंत्री निधी आपत्कालीन नियंत्रण नियंत्रणे तसेच इतर माध्यमातून मदत पुरवण्यात येणार असून वैयक्तिक मदतही देऊन सर्वांना दिलासा देण्यात येणार आहे, असेही डॉ. सावंत यांनी सांगितले

# काणकोण तालुक्यात बीएसएनएल सेवा खंडित

■ टीम दैनिक हेराल्ड

**काणकोण, दि. २५ :** तालुक्यातील भारत संचार निगमची सेवा सध्या मृत्यूशय्येवर दिसत आहे. या खात्याच्या काणकोण तालुक्यातील इमारती म्हणजे भूतबंगले बनले आहेत. या खात्याच्या अशा गलथान कारभारामुळे तालुक्यातील फोन कनेक्शने इतिहासजमा झाली असून सध्या जी हाताच्या बोटावर मोजण्याएवढी कनेक्शने आहेत, ती मागच्या दोन दिवसांत याठिकाणी आलेल्या वादळीवारा आणि विजेच्या कडकडाटासहित पडलेल्या पावसामुळे संपूर्ण निकामी झाली आहेत.

बंद पडलेली यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या हालचाली करण्यात येत नसून एके काळी अत्यंत नफ्यात चालणारी ही यंत्रणा केवळ सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे लयास पोहोचली आहे.

तालुक्यातील पाळोळे येथे या खात्याची भव्य इमारत आहे. शिवाय पैंगीण, आगोंदा, लोलये याठिकाणी स्वतंत्र इमारती आहेत. एके काळी या सर्व ठिकाणी मोठ्या प्रमाणात कर्मचारी वर्ग तैनात केला होता. पाळोळे जंक्शनजवळ असलेल्या कार्यालयीन इमारतीत खात्याचे रहिवासी गाळे होते. आज या गाळ्यांची दयनीय अवस्था झाली आहे. सर्व इमारती भूतबंगले बनले आहेत. भारत संचार निगमच्या असहकार्यामुळे बहुतेक ग्राहकांनी आपली जोडणी तोडलेली आहे.



पाळोळे : येथील भारत संचार निगमचे कार्यालय. (संतोष गावकर)

# वेळसांव किनाऱ्यावर मोठ्या प्रमाणात मासे मृत

- औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया न करता समुद्रात सोडल्याचा दावा
- चौकशी करण्याची मागणी : ओर्विल दोरादो रॉड्रिग्ज

■ टीम दैनिक हेराल्ड

**वास्को, दि. २५ :** एका कंपनीने प्रक्रिया न केलेले औद्योगिक सांडपाणी समुद्रात सोडल्याने वेळसांव किनारयावर मोठ्या प्रमाणात मासे मरून पडल्याचा दावा वेळसांवचे रहिवाशी व गोंयचो एकवोटचे ओर्विल दोरादो रॉड्रिग्ज यांनी केला आहे. याप्रकरणी गोवा राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने पाण्याचे नमुने गोळा करून चाचणी करावी. स्थानिक सरकारी यंत्रणेने सदर प्रकार का व कसा घडला यासंबंधी चौकशी करावी, अशी मागणी केली आहे.

वेळसांव गाव हा मासेमारीसाठी प्रसिद्ध आहे. येथील रापणकारांचा उदरनिर्वाह मासेमारीवरच चालतो. शनिवारी वेळसांव किनाऱ्यावर मोठ्या प्रमाणात मृत मासे आढळून आले. याप्रकरणी ओर्विल दोरादो यांनी एक कंपनी आपले औद्योगिक सांडपाणी प्रक्रीया न करता समुद्रात सोडत असल्याचा दावा केला. तेथील तळ्यामध्ये समुद्राचे पाणी येत असल्याने ते पाणीही दूषित झाल्याने तेथेही मासे आढळत नसल्याचा दावा त्यांनी केला आहे. याप्रकरणी सरकारने लक्ष देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली आहे. अन्य एक रापणकार आग्नेल फर्नांडिस यांनीही सदर प्रकार औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया न करता समुद्रात सोडण्यात आल्याने झाल्याचा दावा केला आहे. याप्रकरणी चौकशी होण्याची गरज त्यानी व्यक्त केली आहे.



वेळसांव : समुद्र किनाऱ्यावरील मृत मासे. (अक्षंदा राणे)

# मोरजी–पंडिरवाडा येथील मिनी पुलाचे काम सोमवारपासून

## आमदार जीत आरोलकर यांची ग्वाही : जुना मिनी पूल कोसळण्याच्या स्थितीत

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. २५ :** मोरजी–पंडिरवाडा येथील अंतर्गत रस्त्यावर असणारा जुना मिनी पूल कोसळण्याच्या स्थितीत आहे. मागील वर्षभर हा पूल दुरुस्त करावा, यासाठी स्थानिक आमदार जीत आरोलकर, पंचायत व नागरिकांनी वरचेवर प्रयत्न केले होते. परंतु सार्वजनिक बांधकाम खाते रस्ता विभागाने या पुलाकडे दुर्लक्ष केल्यामुळे नागरिक नाराज झाले होते. हा पूल येत्या पावसाळ्यापूर्वी पूर्ण झाला नाही, तर मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता आहे. याची गंभीर दखल घेत स्थानिक आमदार जीत आरोलकर यांनी सार्वजनिक बांधकाम खाते रस्ता विभागाचे अधिकारी, कंत्राटदार, स्थानिक सरपंच मुकेश गडेकर, नागरिक यांच्यासहित या पुलाची प्रत्यक्ष पाहणी केली.

यावेळी पावसाळ्यापूर्वी या मिनी पुलाचे काम हाती घ्यावे, अशी सूचना आमदार जीत आरोलकर यांनी कंत्राटदार आणि अभियंत्यांना केली. त्यानुसार अभियंते आणि कंत्राटदराने तशी ग्वाही आमदार जीत आरोलकर यांना दिली. आमदार जीत आरोलकर यांनी सोमवारपासून या पुलाचे काम हाती घेतले जाईल, अशी ग्वाही नागरिकांनी दिल्यावर नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

दरम्यान, या पुलाच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष झाल्याचे वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर आमदार जीत आरोलकर यांनी गंभीर दखल घेतली.

मोरजीतील पंडिर या मुख्य रस्त्याच्या बाजूला एक जुना मिनी पूल होता. त्या मिनी पूलाला गेल्या पावसाळ्यात धोका निर्माण झाला. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम खाते रस्ता विभागाने दखल घेऊन त्याचवेळी या रस्त्यावरून सर्व प्रकारची वाहतूक बंद केली होती. त्यामुळे नागरिकांना दूरवरून प्रवास करावा लागत होता. या पुलाची लवकरात लवकर दुरुस्ती करावी, अशी मागणी वरचेवर नागरिक आणि पंचायत मंडळ करत होते. परंतु या मागणीकडे सरकारने दुर्लक्ष केल्यामुळे वर्षभर या नवीन पुलासंदर्भात नागरिकांना प्रतीक्षा करावी लागली. अधिकारी व कंत्राटदाराने सोमवारपर्यंत काम सुरू करू, अशी ग्वाही दिल्यामुळे या विषयावर तूर्तास तरी पडदा पडला आहे.



मोरजी पंडीरवाडा : नवीन पुलासंबंधी चर्चा करताना आमदार जीत आरोलकर. सोबत सरपंच मुकेश गडेकर, कंत्राटदार व अभियंते.

MBBS



Ministry Of Health Of Russia
SMOLENSK STATE MEDICAL UNIVERSITY, RUSSIA
(104 YEARS OLD MEDICAL UNIVERSITY)
Invites Indian students for direct Government Admissions
Recognized by India, WHO, USA & UK, Min. Qual. 50% in XII in PCB
Satisfies all requirements of NMC of India
**UNIVERSITY** - Founded in 1920, International Rating 22nd, situated in center of city of Smolensk, Smolensk is situated 380 km west of Moscow, Very high standards of education, English Medium in all years, strict disciplinary system. **2050** Indian students (**900** Girls) studying, **330** getting degree in **2024** Closed type campus system, **8** attached hospitals (**9000** Beds).
**MCI SCREENING TEST** – Our graduates of **2008** to **2023** have given **BEST** results among graduates of all foreign medical colleges (Official web sites of Indian Embassy, Moscow and National Board of Examination, New Delhi who conducts MCI Screening Test confirm this).
**SPECIAL HOSTELS ONLY FOR INDIAN STUDENTS (BEST HOSTELS IN RUSSIA)** 2 and 4 seated big rooms, separate hostels for boys and girls.
**INDIAN MESS** - Mess with **Indian food** cooked by **Indian cooks**.
**Fee** (Tuition+Hostel+Med.Ins.) – **USD 6000** (Approx. Rs. 4,94,000/-) per year and one time payment of Rs.1,50,000/- (By Bank Draft only) which includes – Admission procedure, invitation letter, student visa, air ticket Delhi - Moscow.
**Scholarship to all Indian students.**
Bank loans are available from Indian banks.
Contact: **DR. ALOK AERON +7 9605805555 (Russia)**
**Official web site: www.sgmu.info Instagram: @sgmu.info**
**Admission details: admission.sgmu.live**
**INFORMATION CENTERS: (These are parents of our students)**
**PANAJI & NORTH GOA:** Mr. Dayanand Desai - 9158058963
**MARGAO & SOUTH GOA:** Mr. Rajeev Desai – 9850466525
**MAPUSA:** Mr. Subhash Kauthankar - 9823674160

**JOECONS MARINE EXPORTS PRIVATE LIMITED**
L4, M-23, CUNCOLIM INDUSTRIAL ESTATE, CUNCOLIM, SALCETE , GOA
URGENT REQUIREMENTS

| SR. NO. | POST | QUALIFICATION / EXPERIENCES | REQUIRED NO |
| --- | --- | --- | --- |
| 1 | ACCOUNTS EXCECUTIVE | BCOM / MCOM WITH 4-5 YEARS OF EXPERIENCE | 1 |
| 2 | ACCOUNTS ASSOCIATE | BCOM / MCOM WITH 2 YEARS OF EXPERIENCE | 1 |
| 3 | HR - MANAGER | MBA IN HR WITH 5 YEARS OF EXPERIENCE | 1 |
| 4 | HR - EXECUTIVE | BCOM / BBA WITH 2 YEARS OF EXPERIANCE | 1 |
| 5 | ELECTRICIANS | ITI IN ELECTRICALS WITH 1 YEAR EXPERIENCE AND FRESHER CAN APPLY | 1 |
| 6 | RAC TECHNICIANS | ITI IN RAC WITH 1 YEAR EXPERIENCE AND FRESHER CAN APPLY | 1 |
| 7 | DRIVER | MUST HAVE LMV DRIVING LICENCE AND EXPERIENCE OF 4 YEARS | 1 |
| 8 | SECURITY GUARDS | EXPERIENCE OF 4-5 YEARS | 2 |

Send you CV to Email : hr@joeconsmarine.com / MOBILE NO : 9307308766